प्रकरण पाचवे

# आग्रा शिखर परिषद- यशस्वी की अयशस्वी ?

✲ प्रकरण पाचवे ✲

## ✲ आग्रा शिखर परिषद - यशस्वी की अयशस्वी ? ✲

वाजपेयी-मुशर्रफ आग्रा शिखर परिषद उभय देशांतील संबंध सुधारण्याच्या दिशेने एक पाऊलही पुढे न टाकता संपली. शिखर परिषद प्रचंड गाजावाजा करून बोलावली होती. त्यातून काहीतरी भरीव निष्पन्न होईल, आणि शांततेची प्रक्रिया सुरू होईल अशी भारत-पाक मधील सामान्य जनतेची भोळी भाबडी समजूत होती. प्रत्यक्षात त्यांच्या पदरी निराशाच आली. भारत-पाक राष्ट्रप्रमुखांच्या यापूर्वी झालेल्या अनेक चर्चापैकी लाहोर अपवाद वगळता, प्रत्येक परिषदेला युध्दाची पार्श्वभूमी होती. त्या प्रत्येक वेळी युध्दानंतरची सारवासारव करणे एवढाच मुख्य मुद्दा असल्याने दोन्ही देशातील संबंध सुधारण्याचा मुद्दा कोणीच गांभीर्याने घेतला नव्हता.

यावेळी कारगील युध्दाची ताजी कटुता बाजूला ठेऊन त्या युध्दाचे सूत्रधार जनरल मुशर्रफ यांना चर्चेला बोलविण्याचे धाडस वाजपेयींनी केले होते. काश्मीर प्रश्नी भारताची आजवरची भूमिका कायम ठेऊन चर्चा करण्याची, निश्चित कार्यक्रम आखण्याची, शिवाय तो वादाचा मुख्य मुद्दा आहे, हे मान्य करण्याचीही तयारी भारताने दर्शविली होती. परंतु सीमेपलीकडून चालविला जाणारा हिंसाचार बंद करण्याचा मुद्दा मान्य न करण्याचा हटवादीपणा, मुशर्रफ यांनी सोडला नाही. "लवचीकता फक्त तुम्हीच दाखवा, आम्हाला आग्रह करू नका" हा मुशर्रफ यांचा पवित्रा भारताच्या सामंजस्याच्या वातावरणाला काळीमा फासणारा होता. त्यामुळेच दहशतवाद रोखण्याची भारताची ताकद व निर्धार आहे असे परिषदेअखेरीस स्पष्टपणे जाहीर करण्यावाचून पंतप्रधान वाजपेयी यांना पर्याय उरला नाही.

**परिषद अयशस्वी**

'आग्रा शिखरपरिषद अयशस्वी का ठरली? याचे भारताचे परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह यांनी सविस्तर विवेचन करताना पाच प्रमुख कारणे सांगितली आहेत.

१) मुशर्रफ यांनी केवळ काश्मीर हाच प्रश्न भारत-पाक संबंधीत आहे. तो सुटल्याशिवाय कोणतीही प्रगती होऊ शकणार नाही, अशी भूमिका घेतली. भारतास

ही भूमिका मान्य नव्हती. कोणत्याही एका मुद्याला वेठीला धरून प्रगती होणे शक्य नाही. सर्व मुद्यांवर साधक-बाधक चर्चा होणे आवश्यक आहे, ही भारताची भूमिका होती.

२) वाटाघाटीपूर्वीच विषयपत्रिका निश्चित करण्यासाठी दोन्ही देशांत अधिकारी पातळीवर चर्चा केली जावी, हे पाकने मान्य केले नाही. वाजपेयी-मुशर्रफ चर्चेच्या वेळी विषय निवडण्याची मोकळीक द्यावी, असा पाकचा आग्रह राहिला होता.

३) वाटाघाटी सुरू असताना प्रसारमाध्यमांचा वापर करणे योग्य नव्हते. परंतु मुशर्रफ यांनी प्रसारमाध्यमांचा वापर केल्याने त्या चर्चेत काही अर्थ उरला नाही.

४) दहशतवाद आणि हिंसाचाराला सीमेपलीकडून मिळणारे प्रोत्साहन व पाठींबा भारत कदापि मान्य करणार नाही, हे पाकला स्पष्टपणे सांगण्यात आले. त्याची दखल घेण्याची पाकची तयारी नव्हती.

५) सिमला व लाहोर करारांना वाटाघाटीच्या प्रक्रियेपासून अलग करता येणार नाही, असे भारताचे म्हणणे होते. त्या बाबतीतही पाकचा आक्षेप होता.'[१]

शिखर परिषदेनंतर संयुक्त जाहीरनामा व संयुक्त निवेदन करण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. परंतु त्यात यश आले नाही. काश्मीरच्या एकाच मुद्यावर लक्ष केंद्रीत करण्याच्या पाकच्या एकांगी दृष्टीकोनामुळे शिखरपरिषदेच्या वाटाघाटी फिसकटल्या. परराष्ट्र मंत्री जसवंतसिंह यांनी वाटाघाटी फिसकटल्या असल्या तरी "शांती का मे काफिला चलता रहेगा" असे सांगितले.

**पाकच्या आडमुठेपणामुळे आग्रा परिषद फिसकटली-पंतप्रधान वाजपेयी**

'आग्रा शिखर परिषदेनंतर प्रथमच जाहीरपणे वक्तव्य करताना पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी ता. २२ जुलै २००१ या दिवशी चर्चा फिसकटल्याबद्दल पाकवर ठपका ठेवला. जाहीरनाम्यामध्ये सीमापार दहशतवादाचा मुद्दा समाविष्ठ करण्यास पाकने नकार दिला व काश्मीरचा मुद्दा मध्यवर्ती असल्याच्या बाबींवर प्रमाणापेक्षा जास्त भर दिला. अशी वाजपेयींनी टीका केली होती.'[2]

पाक नेत्यांनी सीमापार दहशतवादाचा वारंवार स्वातंत्रलढा असा उल्लेख केला व हा मुद्दा जाहीरनाम्यात समाविष्ट करण्यास विरोध केला. त्यामुळे चर्चा फिसकटली. काश्मीर प्रश्न सुटेपर्यंत दोन्ही देशांतील संबंध सामान्य होऊ शकत नाहीत. अशी आग्रही भूमिका पाकने घतली. आपण व अध्यक्ष मुशर्रफ कराराच्या मसुद्यावर अगदी जवळ आलो होतो. हा पाकचा दावा खोटा आहे असे सांगून ते म्हणाले की, शिखर परिषदेत मसुदा पुढे आला नाही. केवळ शिष्टमंडळ चर्चा झाली. काही मुद्यांवर दोन्ही बाजूंनी एकमत झाले होते. पण दोन्ही बाजूंनी एकमत झाले होते. पण दोन्ही राष्ट्रे मसुद्यावर स्वाक्षरी करण्यासाठी जणू तयारच होते, असे म्हणणे चुकीचे आहे.
भारत-पाक दरम्यानचे द्विपक्षीय प्रलंबीत प्रश्न सोडविण्यासाठी सदिच्छेने मदत करण्यास तयार आहेत. द्विपक्षीय चर्चेत मध्यस्थांची गरज नाही. शिखर परिषदेच्या वेळी मंत्री पातळीवर अनेक वेळा बैठका झाल्या. काही त्रुटी असतील तर त्या मंत्रीपरिषदेचा नेता या नात्याने त्या त्रुटी माझ्या असतील असे वाजपेयी यांनी मत मांडले.

सर्वसाधारणपणे भारत-पाक शिखर परिषद असफल झाली, असे म्हणता येईल. दोन्ही देशांनी शिखर परिषदेच्या फलनिष्पत्तीबाबत आशावादी सूर लावला. भारताच्या बाजूने परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह यांनी शिखर परिषद सफल झाली नसली तरी भारताचा प्रामाणिकपणा जगापुढे गेला. पाकचे परराष्ट्रमंत्री अब्दुल सत्तार यांनी ‘वाजपेयी-मुशर्रफ चर्चेतून फलनिष्पत्ती होऊ शकली नाही, तरीही दोन्ही देशांमध्ये भरीव सदिच्छा निर्मिती झाली आहे. त्याचा भविष्यात दोन्ही देशांना फायदाच होईल. जनरल मुशर्रफ यांनाही या चर्चेतून काहीतरी चांगले निघेल, याची खात्री होती. भारताच्या अधिकृत निवेदनात ‘एका प्रक्रियेला आरंभ व एका प्रवासाची सुरूवात झाली होती, उभय पक्षांना मान्य असलेल्या जाहिरनाम्याच्या टप्यापर्यंत पोहचण्यात अपयश आले होते, असे शिखर परिषदेच्या फलनिष्पत्तीसंबंधी जाहीर करण्यात आले होते.’

अमेरीकेने शिखरपरिषदेच्या फलश्रृतीबाबत अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. शिखर परिषदेच्या अयशस्वीतेबद्दल एकमेकांवर खापर फोडताना शेजारी राष्ट्रांनी उभय देशांतील संवाद

यापुढेही कायम राहील, अशी ग्वाही देखील दिली आहे. शिखरपरिषद फसली तरी उभय देशांत चर्चा झाली ही समाधानाची बाब आहे.

**प्रसार माध्यमांनी गाजविलेली परिषद**

'यापूर्वी देशांत अनेक परिषदा झाल्या, त्याची माहीती वृत्तपत्रातून व टि.व्ही. माध्यमातून वार्ता स्वरूपात असे. पण आग्रा शिखर परिषद मात्र प्रसारमाध्यमांनी धमाल उडवून गाजविली. या परिषदेस देशी-विदेशी पत्रकार, चित्रवाहिन्या, छायाचित्रकार इ. प्रसारमाध्यमांचे सुमारे ७०० प्रतिनीधी उपस्थित होते. त्यांनी इलेक्ट्रॉनिक्स माध्यमातून सलग तीन दिवसात २४ तास या परिषदेचे वृत्त जगभर प्रसारीत केल होते. मुशर्रफ यांचे इस्लामाबादहून दिल्लीस आगमन, राष्ट्रपती भवनातील स्वागत, पंचतारांकित हॉटेलातील कार्यक्रम, दर्यागंजमधील नहरवाली हवेलीची भेट, ताजमहालमधील फेरफटका, मुलाखती, परिषदेतील लहानमोठ्या नेत्यांची आणि राजनैतिक अधिकाऱ्यांची लगबग, इ. दृश्ये इतक्या विस्तारपूर्वक दाखविली गेली, की एखाद्याला आपण एखादा गाजलेला चित्रपटच पाहत आहोत, असा भास व्हावा. वृत्तपत्रांनी रकानेच्या रकाने भरून परिषदेतील चढउतारांची रसभरीत वर्णने व छायाचित्रे दिली. त्या तीन दिवसात भारतात शिखर परिषद हा एकच प्रसंग फक्त सध्या घडत असून, बाकी सर्व जग नि:स्तब्ध असावे असे वाटत होते.'[३]

एकंदरीत असे वाटले कि, प्रसारमाध्यमांनी शिखर परिषदेच्या फलनिष्पत्ती संबंधी भलतेच आशादायक चित्र निर्माण केले होते. परंतु परिषदेच्या विफलतेमुळे सर्वसामान्यांची घोर निराशा झाली असे म्हणावे वाटते.परिषदेतून अपेक्षित फलनिष्पत्ती न झाल्याने सर्वसामान्य लोक निराश झाले.

**काश्मीर प्रश्नाची निकड**

१) 'आग्रा शिखरपरिषदेचे १६ जुलै २००१ रोजी सूप वाजले. परिषद अयशस्वी झाली. सारेच प्रश्न अनिर्णित राहीले. शिखरपरिषदे पूर्वी काश्मीरमध्ये जी परिस्थिती होती, ती तशीच राहीली, इतकेच नव्हे तर तेथील परिस्थिती जास्त गंभीर होण्याचा धोका निर्माण

झाला, नव्हे ती झालीच आहे. हे काश्मीर मधील हिंसाचारात आणि निरपराध काश्मीरींच्या हत्येत दिवसेंदिवस वाढच होत आहे. यावरून स्पष्ट झाले.'[४]

२) 'भारत-पाक यांच्यातील संबंध सुधारण्याच्या दिशेने उभय राष्ट्रप्रमुखांनी टाकलेले पहिले महत्वाचे पाऊल ठरले असले तरी जनरल मुशर्रफ यांच्याशी झालेल्या पहिल्या भेटीतच लालकृष्ण अडवाणी यांनी उपस्थित केलेले मुद्दे अत्यंत महत्वाचे आहेतच. उभय राष्ट्रांच्या मैत्रीतील हा प्रमुख अडसर असल्याचे मुशर्रफ यांनी देखील ही गोष्ट मान्य केली आहे. वादग्रस्त बाबरी वास्तू पाडल्यानंतर कडवट प्रक्रियेतून मुंबईत झालेल्या बॉबस्फोट प्रकरणातील प्रमुख सुत्रधार दाऊद इब्राहिम यांच्या अटकेची मागणी जरी पूर्ण झाली, तरीही या मैत्री संबंधातील एक अडथळा दूर झाला असे म्हणता येईल. पण मुशर्रफ यांनी 'दाऊद कराचीत राहत नाही' असे सांगून हा मुद्दा खोडून काढला. मग प्रश्न असा आहे की, आता दाऊद राहतो कुठे? मध्यंतरी दाऊदच्या निवासस्थानाची प्रकाशचित्रे "इंडिया टूडे" मध्ये प्रसिध्द झाली होती. यांचा अर्थ मुशर्रफ यांना किंवा भारतीय गुप्तहेर संस्थांना पुन्हा दाऊदचा नव्याने शोध घ्यावा लागणार आहे. पंतप्रधान वाजपेयी यांनी भारतीयं युध्दबंदीचा प्रश्न व्यक्तीगत पातळीवर मांडला होता. त्यालाही मुशर्रफ यांनी नकारात्मक उत्तर दिले.आग्रा येथे जेष्ठ संपादकाबरोबर चर्चा करताना त्यांनी असे म्हटले होते की, मी स्वत: जनरल (लष्करी व्यक्ती) आहे आणि लष्करी कैद्यांच्या सुटकेसाठी प्रयत्न केले नाहीत तर मला वेडे ठरविण्यात येईल. तरीही याबाबतीत मी स्वत: जातीनिशी चौकशी करेन.'[५]

३) 'दहशतवादाने काश्मीरचे आतोनात नुकसान केलेच. पण भारताच्या अर्थकरणावर एक विलक्षण दबाव आणला आहे आणि या दोन्ही गोष्टी उभय राष्ट्रांच्या हिताच्या नव्हत्या. काश्मीर खोऱ्यात पाकप्रणित दहशतवाद्यांनी १९९० ते १९९७ या काळात जवळजवळ ४० हजार माणसे मारली गेली. यातील बहुसंख्य तरूण होते. दहशतवादाचा आणखी एक भीषण दुष्परिणाम म्हणजे तेथील नागरिकांचे मानसिक संतुलन बिघडले आहे.

श्रीनगर मधील इस्पितळात १९८० ते १९९० या काळात पाच हजार मानसिक रूग्ण नोंदले गेले आहेत. १९९० ते १९९४ या चार वर्षाच्याकाळात ही संख्या ४१६०० इतकी झाली होती. त्यातील बहुसंख्य रूग्ण दहशतवादी व सुरक्षादलाच्या चकमकीने धास्तावलेले किंवा ज्यांच्या घरातील एखादी व्यक्ति मारली गेली असे होते. दहशतवादामुळे पर्यटन हा प्रमुख उद्योग जवळजवळ संपत चाललेला आहे. त्यामुळे बेकारी वाढली आहे, दारिद्र्य वाढले आहे. याचा परिणाम भारत-पाक अर्थकारणावर झाला. दोन्ही राष्ट्रांच्या लोकांनी ही गोष्ट लक्षात घ्यायला हवी.काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे आणि तो तसाच ठेवण्यासाठी १९९१-९२ पर्यत सुमारे ७५ हजार कोटी रूपये भारत सरकारने खर्च केले. जम्मू-काश्मीरमध्ये भारत सरकारने या काळात दरडोई ११२२ रूपये खर्च केले आणि भारताच्या तुलनेत येथील लोकसंख्या आहे ०.७८% आहे. देशातील सर्वात मोठे व देशाला पंतप्रधान पुरविणाऱ्या उत्तरप्रदेश सारख्या राज्यात केंद्राने दरडोई ९१ रूपये खर्च केले. मग बिहारमध्ये किंवा बंगाल या विरोधकांच्या राज्यातील स्थिती काय असेल ? तेथे दरडोई अनुक्रमे ११९रू., ६७रू. खर्च करण्यात आले. या राज्यात सर्वात जास्त बेकारी आणि गरीबी आहे. प्रत्येक राज्याला केंद्र सरकार ७०% कर्ज आणि ३०% मदत देत असते. पण काश्मीरच्या बाबतीत मात्र १०% कर्ज व ९०% मदत दिली जाते. लष्करावरील कित्येक हजार कोटी रूपये दररोज खर्च होतच असतो.'[६]

**<u>पुढे काय?</u>**

काश्मीरच्या हिंसाचारापुढे पुढे काय? हा प्रश्न अनुत्तरीत राहिला. काश्मीरमधील हिंसाचारात दिवसेंदिवस वाढ होत आहे. यावरून असे स्पष्ट होते की पुढे काय? भारताने देशातील अनेक संघटना आणि काही राजकिय पक्षांचा विरोध असतानाही सौजन्याचा भाग म्हणून परवेझ मुशर्रफ यांना परस्पर संबंधात शांततेचे नवे पर्व सुरू व्हावे म्हणून भारतात बोलावले. परंतु मुशर्रफ यांनी काश्मीर मुद्यावर हटवादीपणा पत्करून चर्चेत विक्षेप आणला.

त्यामुळे वाटाघाटीत एक पाऊल पुढे पडले नाही. भारताचा सगळा खटाटोप वाया गेला, असेच म्हणावे लागेल.

**पाकच्या दृष्टीकोनातून-**

'पाकच्या दृष्टीने काश्मीर प्रश्न आंतरराष्ट्रीय स्तरावर नेण्यात मुशर्रफ यांना यश मिळाले. आणि पाक जनतेलाही दिलासा मिळाला. वैयक्तिकदृष्ट्या मुशर्रफ यांना राष्ट्राध्यक्ष म्हणून प्रतिष्ठाही प्राप्त झाली. राजनैतिक डावपेचात मुशर्रफ सरस ठरले. 'जम्मू-काश्मीर' हा आपला अविभाज्य भाग आहे, अशी भूमिका जोपर्यंत भारत घेईल, तोपर्यंत उभय देशातील चर्चा अर्थहिन ठरेल, असा त्यांनी भारताला इशारा दिला. 'काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी प्रामाणिक हेतूने मी भारतात गेलो असे सांगून त्यांनी तीन प्रश्न उपस्थित केले.'

**मुशर्रफचे तीन प्रश्न-**

१) आपणास खरोखर शांतता हवी आहे काय?

२) काश्मीर प्रश्न सुटल्याशिवाय शांतता शक्य आहे काय?

३) काश्मीर मधील लोकांना सहभागी करून घेतल्याशिवाय हा प्रश्न सुटू शकेल काय?

मुशर्रफ यांनी म्हटले आहे की, "आग्रा शिखर परिषदेतून मी रिकाम्या हाताने परत आलो असलो, तरी निराश झालो नाही. उभय देशांदरम्यानचे संबंध सुरळीत होण्यासाठी चर्चा सुरू होणे गरजेचे होते. या दौऱ्यामुळे उभय देशांत पूरक वातावरण निर्मिती झाली असून या पुढील काळात चर्चा सुरू राहील. " याच साठी त्यांनी पंतप्रधान वाजपेयींना पाक भेटीचे निमंत्रण आपल्या उद्दिष्टांबाबत शंका असू नये म्हणून दिले असावे.'[७]

स्वत:च्या अटी तयार ठेऊन चर्चा व्हावी असे मुशर्रफ यांना वाटत होते. मुशर्रफ यांना चर्चेचा 'सिलसिला जारी राहावा', असे वाटत असले तरी, "तो माझ्या अटीवर व्हावा" हीच त्यांची धारणा होती. चर्चेची सूत्रे आपल्या हातातून जात आहेत, अशी क्षणभर जरी

पाकवासियांना शंका आली, तर मुशर्रफ यांचे सत्तास्थान डळमळीत होईल, याची त्यांना खात्री होती. १० ऑगस्ट २००१ रोजी भारत-पाकमधील स्वयंसेवी संस्थांची एक परिषद महाराष्ट्रातील सातारा जिल्हयातील पाचगणीत झाली. त्या परिषदेत पाकचे माजी लष्कर प्रमुख व मुशर्रफ यांचे कट्टर समर्थक ले. ज. नासीर अख्तर म्हणाले होते-"काश्मीर हा सर्वात महत्वाचा मुद्दा पाकमधील लोकांना वाटतो. " '

'They live with Kashmir, they eat with Kashmir and they sleep with Kashmir.'

"काश्मीरपासून दूर जाणारे सरकार, मग ते लोकशाहीचे असो वा लष्करशाहीचे असो, अकार्यक्षम ठरवते." या विधानात काही प्रमाणात तरी सत्यांश असावा, असे मागील इतिहास पाहताना जाणवते.

**भारतीय संसदेतील वाजपेयींचे भाषण-**

'आग्रा शिखरपरिषदेच्या फलश्रृतीबाबत भारतीय संसदेत झालेल्या चर्चेला उत्तर देताना पंतप्रधान वाजपेयी यांनी स्पष्ट केले की, शिखर परिषदेच्या अपयशाला पाकच जबाबदार आहे. काश्मीरमध्ये पाकतर्फे चालविलेला दहशतवाद ही काही स्वातंत्र्याची लढाई नव्हे. तर मूलतत्ववादाचे ते उघड प्रदर्शन आहे. काश्मीरचा मुद्दा केवळ प्रादेशिक नसून भारताच्या जीवनाचा एक हिस्सा आहे. तरीही आमचे शांततेचे प्रयत्न चालू राहतील. परराष्ट्रमंत्री जसवंतसिंह यांनी पाकमध्ये काहीशी कठोर भूमिका स्वीकारताना लोकसभेत प्रतिपादन केले की, काश्मीरचा मुद्दा पुढे करून भारत-पाक दरम्यानच्या वाटाघाटींना ओलीस ठेवता येणार नाही. वाटाघाटीचा कांगावा चालू राहिल, या प्रक्रियेला आता युध्दखोरही थोपवू शकणार नाहीत.'[८]

**तज्ञांची मते-**

'काश्मीरबाबत भारत-पाक संबंधातील पराकोटीचे वैर लक्षात घेता, हा वादग्रस्त मुद्दा दूर ठेऊन इतर मुद्यांबाबत चर्चा करण्यांस हरकत नाही. अशीही काही तज्ञांची मते भारतात व्यक्त करण्यात आली. भारत-चीन यांच्यातील १९६२ साली कडा संघर्ष होऊनही सीमा प्रश्नांचा मुद्दा

बाजूला ठेऊन राजीव गांधींनी चीनशी संबंध सुधारण्याचे प्रयत्न केले. त्यानंतर भारत-चीन संबंध गेल्या दशकात बरेच सुधारले आहेत. वास्तविक चीनने अक्साई चीनचा सुमारे ३६०० चौ.मैलाचा भारतीय भाग १९६२ नंतर बळकावलेला आहे. त्यासंबंधी कोणतीही तडजोड न स्वीकारता दोन्ही देशांनी परस्परांत मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण केले आहे. हेच उदाहरण समोर ठेऊन भारत-पाकने सतत वैर-भाव ठेवण्याऐवजी व्यापार, दळणवळण, आयात-निर्यात, व्यवहार, शैक्षणिक व सांस्कृतिक आदान-प्रदान इ. बाबींवर चर्चा केल्यास उभय देशांच्या विकासास फायदेशीर ठरेल, असा विचार व्यक्त केला गेला आहे. सीमाप्रश्नी चीन-रशिया यांच्यात मतभेद असूनही १९९७ व २००१ मध्ये त्यांच्यात मैत्री करार घडून आले आहेत.'[९] हे उदाहरणही भारत-पाक संबंधात मार्गदर्शक ठरेल, असा दृष्टीकोनही मांडण्यात आला आहे.

'भारत-पाक राष्ट्रप्रमुखांची ऑक्टोबर २००१ मध्ये युनो आमसभेच्या अधिवेशनाच्या निमित्ताने भेट झाली. दरम्यान १० ऑगस्ट२००१ रोजी कोलंबोत भारत-पाक यांच्यात परराष्ट्र सचिव पातळीवर चर्चा झाली. या चर्चेत भारताच्या सचिव चौकिला अय्यर यांनी पाकचे सचिव इनामूल हक यांच्याकडे भारताची भूमिका स्पष्ट करून-"भारताबरोबर कसे संबंध ठेवायचे हे आता पाकने ठरवावे. सीमेपलीकडून चाललेल्या दहशतवादामुळे या दोन्ही करारांचे तसेच आंतरराष्ट्रीय संकेताचे उल्लंघन होत आहे. दोन्ही देशातील मतभेद दूर होण्यास अनुकूल वातावरण तयार होण्यासाठी परस्पर विश्वासाचे बांध निर्माण झाले पाहीजेत. असे सांगितले.'[१०]

या सर्व चर्चेचा रोख भारत-पाक संबंध सुधारण्यासाठी उभय राष्ट्रप्रमुखांच्या गाठीभेटी होत राहिल्या पाहिजेत, त्या होतील की नाही, हे काळच ठरविल. वाजपेयींनी पाक भेटीचे निमंत्रण औपचारिकपणे स्वीकारले असले, तरी "काश्मीर एके काश्मीर, काश्मीर दुणे काश्मीर" हे धोरण मुशर्रफ यांनी सोडल्याशिवाय पंतप्रधानांनी पाकला जाऊ नये, असा दबाव सतत त्यांच्यावर येत आहे. या दबावाला पंतप्रधान वाजपेयी बळी पडण्याची शक्यताच सद्य परिस्थितीत वाटते."

**अशांत काश्मीरचे रक्तरंजीत आव्हान-**

'काश्मीरातील लष्कर-ए-तोयबा, हिजबुल मुजाहिदी, हरकत-उल-अन्सार ऑल पार्टी, हुरियत कॉन्फरन्स इत्यादी अतिरेकी व दहशतवादी संघटनांना शिखर परिषद फिसकटावी असेच वाटत होते. कारण शिखर परिषदेची चर्चा भारतात चालू असतानाच ६ जुलै २००१ रोजी लष्कर-ए-तोयबाने अमरनाथ यात्रेस संरक्षण देणाऱ्या लष्करी तुकड्यांवर हल्ला करून तीन जवानांना ठार केले व सहा जखमी केले. एक अतिरेकीही मारला गेला. शिखरपरिषदेला अपशकुन करण्याचेच हे कृत्य होते. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे शिखर परिषद फिसकटली आणि अतिरेकी मोकाट सुटले. शिखरपरिषदेची बैठक १६ जुलैला समाप्त झाल्यानंतरच्या वीस दिवसात (सात ऑगस्टपर्यंत) जम्मू-काश्मीर मध्ये हिंसाचाराच्या ११ घटना घडल्या. त्यात ६५ निरपराधांचे बळी गेले. १३ अतिरेकीही ठार झाले. त्यात अमरनाथ यात्रेतील तेरा लोक (२१जुलैला), २२ जुलैला दोडा जिल्हयातील लछना दार व चिरजी गांवातील वीस लोक, २३जुलैला श्रीनगर व बांदीपूरमध्ये चार लोक, ४ ऑगस्टला दोडा जिल्ह्यातील लुडर गावातील सतरा लोक, ७ ऑगस्टला जम्मू रेल्वे स्थानकावर अकरा लोकांचा समावेश आहे.'[११]

अतिरेक्यांचे दुसरे लक्ष हिंदू हे होते. या पुढेही आणखी हत्याकांडाच्या घटना घडतच राहणार आहेत. या परिस्थितीला खंबीरपणे तोंड देण्यासाठी आणि दहशतवाद निपटून काढण्यासाठी लष्कराला भरपूर अधिकार देण्यासाठी जम्मू विभागातील जम्मू, दोडा, उधमपूर, राजौरी, पूँछ, कथुआ, हे सहाही जिल्हे अशांत म्हणून गृहखात्याने जाहीर केले. त्यावेळी लोकसभेत निवेदन करताना गृहमंत्री म्हणाले, "जम्मू काश्मीरमध्ये अतिरेक्यांच्या विरूध्दच्या मोहिमेत त्याकाळात सुरक्षादलाला मिळालेल्या यशामुळे अतिरेक्यांनी आता निरपराध नागरिकांवर हल्ला करण्याचे सत्र सुरू केले आहे. हे प्रकार पाक पुरस्कृत असून यापूर्वीच्या तीन प्रत्यक्ष युध्दाप्रमाणे या छुप्या युध्दात पाकला पराभूत केले जाईल."

शेवटी आग्रा शिखर परिषद भारत-पाक वाटाघाटीमधील सुरूवात आहे की शेवट आहे. याचा निर्णय पुढील भविष्याच्या पेटीत कुलूपबंद आहे, एवढेच म्हणता येईल.

दिनांक १३/०८/२००१ या दिवशी इंडिया टुडेने या स्थितीचे वर्णन अशा शब्दात केले आहे.

"Guns are already booming along the line of control and the army is steeling it self for an escalation in violence in the valley following the Agra Summit." [12]

✲ संयुक्त पत्रकाविना परिषद समाप्त :-

'देशो-देशींच्या शिखर परिषदांच्या अखेरीस परिषदेत मंजूर झालेल्या मुद्यांवर एक संयुक्तपत्रक काढण्याची प्रथा असते. आग्रा शिखर परिषदेत संयुक्त पत्रक काढण्यावरुन बरीच वादावादी झाली. १६ जुलैच्या रात्रीपर्यंत महत्वाच्या मुद्यांवर सहमती झालेली नसली, तरी ज्या मुद्यांवर थोडी फार सहमती झालेली आहे. त्यांचा उल्लेख करुन भारताचे पराराष्ट्र मंत्री जसवंतसिंह व पाकचे परराष्ट्रमंत्री अब्दुल सत्तार हे दोघेही प्रयत्नशील होते, परंतु काश्मीर प्रश्नावरुन चर्चा पुढे सरकलीच नाही, त्यामुळे इतर मुद्दे चर्चेत आलेच नाहीत, परिणामी अन्य मुद्यांवर सहमतीचा प्रश्न उद्भवलाच नाही. अखेरीस कोणतेही संयुक्त पत्रक न काढता परिषदेची सांगता झाली. मुशर्रफ यांना परिषदेतून भरीव असे काहीच हाती न लागल्याने वैतागले होते.'[१३]

**मायदेशी इस्लामबादला रवाना :-**

'परिषदेतील चर्चेतून कोणताही मार्ग न मिळाल्याने मुशर्रफ जयपूर-अजमेर भेटीचा नियोजित कार्यकम रद्द करुन कोणताही औपचारीक निरोप समारंभ न होता मुशर्रफ यांनी वाजपेयी यांचा जे. पी. पॅलेसमध्ये निरोप घेऊन इस्लामाबादला दि. १६ जुलै २००१ रोजी, या रात्रीच मायदेशी निघून गेले.'[१४]

## ✻ समारोप ✻

१५ जुलै २००१ रोजी आग्रा येथे झालेल्या शिखर परिषदेबाबत परिषदेच्या आधी सहा महिन्यापासून नको इतकी प्रसिध्दी झाली होती. परंतु प्रत्यक्षात पाकचे लष्करप्रमुखाऐवजी राष्ट्राध्यक्ष म्हणवून घेणारे मुशर्रफ यांच्या दृष्टीने ती परिषद जास्त यशस्वी ठरली असे दिसून येते. ही परिषद पूर्वनियोजीत होतीच. पाक स्वत:ची बाजू पक्की तसेच मजबूत करूनच परिषदेला आले होते. भारताने पुन्हा एकदा या परिषदेमध्ये निर्णयक्षमता, प्रसारमाध्यमांचा वापर नीट न केल्यामुळे याही नियोजनात भारताला अपयश पत्करावे लागले, मात्र यात भारताची जास्त बदनामी झाली, असेच म्हणता येईल. खरे तर भारताने पाककडून शिखरपरिषदेच्या उद्देशाची श्वेतपत्रिका मान्य करूनच निमंत्रण द्यायला हवे होते. पाकचे राष्ट्राध्यक्ष मुशर्रफ हे भारतात येऊन पाकधार्जीण दहशतवादी संघटनांना चर्चेला बोलावून एक प्रकारे त्यांच्या कृत्याचे समर्थन केल आहे. परिणामीनंतर दहशतवादी कृत्यांना उधाण येऊन अनेक निरपराधी लोक नाहक मारले गेले. यात पाक बरोबर भारतही जबाबदार ठरतो. भारताने आतापर्यंत चीन बरोबर पडती भूमिका घेतलीच आहे. आता तर पाकसमोर देखील नमते धोरण स्वीकारायला सुरूवात केली आहे.

१९७१ सालच्या पराभवाची सल पाकच्या मनातून अद्याप गेलेली नाही. आग्रा शिखर परिषदेची चर्चा पूर्ण होण्याच्या आतच भारत सरकारवर पाक जनतेचा विश्वास नाही असे विधान मुशर्रफ जाहिरपणे करतात, यातच त्यांचा मतलबीपणा स्पष्ट दिसला. चर्चेच्या प्रत्येक टप्यात आपल्याला अपेक्षीत निर्णय होत नाहीत, हे लक्षात आल्यावर आपले वैफल्य वार्तालापाच्या कार्यक्रमात त्यांनी व्यक्त केले. काश्मीर प्रश्न हा एकच मुद्दा आहे, असे ठामपणे सांगताना, एक वेगळाच तर्कदुष्टपणा त्यांनी मांडला. 'वाजपेयींनी चर्चेसाठी आपल्याला बोलावले हा पहिला टप्पा आहे. आता काश्मीर हाच मुख्य मुद्दा मान्य करणे हा दुसरा टप्पा होय आणि काश्मीरी प्रतिनिधींना चर्चेत सहभागी करणे हा तिसरा टप्पा' असे तारे त्यांनी तोडले. चर्चा निम्म्यावर आली असताना असली वक्तव्ये करणे राजशिष्टाचाराला धरुन नव्हते. चर्चेतील प्रगतीपेक्षा पाक

जनतेला आपला आक्रमकपणा दाखविण्याची संधी म्हणून त्यांनी संपादक वार्तालापाच्या कार्यक्रमाचा उपयोग करुन घेतला. यावरुन याचवेळी परिषदेचे भवितव्य स्पष्ट झाले होते.

## ✻ प्रकरण पाच - संदर्भ सूची ✻


१) प्राचार्य य. ना. कदम - चालू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडी -(२०००-२००२)-फडके प्रकाशन कोल्हापूर - प्रथम आवृत्ती - पान नं.१७६

२) दैनिक लोकसत्ता - २३ जुलै २००१ - पान नं.१ व ६

३) प्राचार्य य. ना. कदम - चालू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडी -(२०००-२००२)-फडके प्रकाशन कोल्हापूर - प्रथम आवृत्ती - पान नं.१७७

४) दैनिक लोकमत - १७ जुलै २००१ - पान नं. १

५) दैनिक लोकसत्ता - १६ जुलै २००१ - पान नं.१

६) श्री. अरविंद गोखले - कारगिल ते कंदहार - चिनार प्रकाशन पुणे - प्रथम आवृत्ती - पान नं. ७१

७) प्राचार्य य. ना. कदम - चालू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडी -(२०००-२००२)-फडके प्रकाशन कोल्हापूर - प्रथम आवृत्ती - पान नं.१७८

८) दैनिक लोकमत - २७ जुलै २००१ - पान नं. १

९) डॉ. कृष्णकुमार रत्तू - भारत-पाकिस्तान संबंध-रत्तू प्रकाशन जयपूर-पान नं-१२३

१०) प्राचार्य य. ना. कदम - चालू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडी -(२०००-२००२)-फडके प्रकाशन कोल्हापूर - प्रथम आवृत्ती - पान नं.१७९

११) प्राचार्य य. ना. कदम - चालू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय राजकीय घडामोडी -(२०००-२००२)-फडके प्रकाशन कोल्हापूर - प्रथम आवृत्ती - पान नं.१८० ते १८१

१२) इंडिया टुडे साप्ताहिक - स्वपन दासगुप्ता - ता. १३ ऑगस्ट २००१ - पान नं. - ४

१३) दैनिक लोकसत्ता - १७ जुलै २००१ - पान नं.१

१४) महाराष्ट्र टाइम्स - १७ जुलै २००१ - पान नं. १ व २